नाशिक महानगरपालिका, नाशिक

राष्ट्रीय फेरीवाला धोरण विभाग

तळमजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक ४२२००२

# अधिसूचना

पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४

क्रमांक नामनपा/राफेधो/कार्या-१/प्र.क्र.-३९/२०१८-नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे विनियमन व नियत्रंण करण्याच्या दृष्टीने, पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ याच्या कलम ३७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, नाशिक महानगरपालिकेने ठराव क्रमांक १२०२ दिनांक ०३/०१/२०१८ अन्वये तयार केलेल्या उपविधींचा मसुदा, त्याव्दारे बाधित होण्याची शक्यता असणा-या सर्व व्यक्तींच्या मा हितीसाठी याव्दारे पसिदध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन तीस दिवसांच्या कालावधीत उक्त मसुदा संबधित कोणत्याही व्यक्तींकडुन ज्या कोणत्याही हरकती किंवा सुचना असतील अशा हरकती किंवा सुचना राष्ट्रीय फेरीवाला धोरण विभाग तळमजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक ४२२००२ येथे आणि नाशिक महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय नाशिक पुर्व, विभागीय कार्यालय नाशिक पश्चिम, विभागीय कार्यालय पंचवटी, विभागीय कार्यालय नाशिकरोड, विभागीय कार्यालय नविन नाशिक, विभागीय कार्यालय सातपुर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती किंवा सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

## उपविधींचा मसुदा

प्रस्तावनाः-

केंद्रशासनाने पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ दिनांक १ मे, २०१४ पासुन लागु केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३६ नुसार मा.महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ व अधिनियमाच्या कलम ३८ नुसार पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात लागु करण्यात आली आहे.

आता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५८ आणि पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या

अधिकारांचा वापर करुन, नाशिक महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे विनियमन व नियंत्रण करण्याकरीता पुढील उपविधी करीत आहे.

प्रकरण एक

## प्रारंभिक

१. (क) **संक्षिप्त नांव:-** या उपविधींना, पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (नाशिक महानगरपालिका) उपविधी, २०१७ असे संबोधण्यात येईल.

(ख) हे उपविधी नाशिक महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु राहतील.

२. **व्याख्या:-** या उपविधींमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) “अधिनियम” याचा अर्थ, पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ असा आहे.

(ख) “नियम” याचा अर्थ, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ असा आहे.

(ग) “योजना” याचा अर्थ, पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ असा आहे.

(घ) या उपविधीमध्ये वापरलेले, परंतु विनिर्दिष्टपणे व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये, नियमांमध्ये, योजनामध्ये जो अर्थ नेमुन दिलेला असेल तोच अर्थ असेल.

प्रकरण दोन

### नाशिक महानगरपालिका हददीतील पथविक्रेत्यांचे सर्व्हेक्षण व नोंदणी

३. १) नाशिक महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयातंर्गत येणा-या क्षेत्रांतील पथविक्रेत्यांचे विभागीय अधिकारी स्तरावर दर पाच वर्षांनी नाशिक महानगरपालिका नगर पथ विक्रेता समिती मार्फत सर्वेक्षण करण्यात येईल.

२) सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यापूर्वी नाशिक महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षणाची पध्दती, नियोजन इत्यादींबाबत पर्याप्त प्रसिध्दी देण्यात येईल.

३) सर्वेक्षणामध्ये विभागीय अधिकारी स्तरावर पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ समवेतच्या परिशिष्ठ-१ मधील नमुन्यात प्रत्येक पथविक्रेत्यांची माहिती संकलित करण्यात येईल.

४) पथविक्रेता म्हणुन नोंदणी करण्यासाठी व्यक्तीकरीता पुढीलप्रमाणे पात्रता निकष असतील.

I) ती भारताची नागरीक असावी.

Ii) ती महाराष्ट्रातील अधिवासी असावी.

Iii) तिचे वय सर्वेक्षणाच्या दिनांकास १४ वर्षापेक्षा कमी नसावे.

iv) तिला पथ विक्री खेरीज उपजिविकेची अन्य साधने उपलब्ध असणार नाहीत.

५) नाशिक महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याने नोंदणी प्रमाणपत्र, पथविक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिल्याशिवाय केवळ पथविक्रेता म्हणुन नोंदणी केल्यामुळे/यशस्वीरीत्या नोंदणीकृत पथविक्रेता यादीमध्ये नाव प्रसिध्द झाल्यामुळे पथविक्री करण्याचा कोणताही हक्क प्रदान होणार नाही.

६) विभागीय कार्यालय निहाय सर्व पथविक्रेत्यांची माहिती (Database) ठेवण्यात येईल.

## प्रकरण तीन

## निर्बंधमुक्त विक्री प्रक्षेत्रे, निर्बधित विक्री प्रक्षेत्रे आणि विशिष्ठ प्रयोजनासाठी समर्पित केलेल्या विक्री प्रक्षेत्रात पथविक्रीचे विनियमन आणि पध्दती.

४. (क) विक्री प्रक्षेत्रात विक्री प्रमाणपत्र दिलेल्या विक्रेत्यासच व्यवसाय करता येईल.

(ख्) एका स्थिर पथविक्रेत्यासाठी १ मीटर × १ मीटर जागेचा विचार करणेत येईल. मात्र जो व्यवसाय या भागाच्या जागेत होऊ शकत नाहीत, (उदा. उसाच्या रसाची विक्री) अशा व्यवसायासाठी १ मीटर × १ मीटर किंवा जागेच्या उपलब्धतेनुसार त्या पटीत जागेचा विचार करण्यात येईल.

(ग) पथविक्रेत्यास, त्यास नेमुन दिलेल्या जागेतच व्यवसाय करावा लागेल, त्यापेक्षा अधिक जागा वापरता येणार नाही.

(घ) पादचा-यांना/वाहनांना ये - जा करण्यासाठी अडथळा होईल अशा रितीने व्यवसाय करता येणार नाही.

(ङ) विक्री प्रक्षेत्राच्या धारण क्षमतेपेक्षा अधिक विक्रेत्यांना संबंधित विक्री प्रक्षेत्रात विक्री प्रमाणपत्र देण्यात येणार नाहीत. पथविक्री प्रक्षेत्रात सार्वजनिक उपयोगाच्या कामासाठी पुरेशी जागा सोडणे आवश्यक राहील.

(च) निर्बधिंत विक्री प्रक्षेत्रात नेमुन दिलेल्या वेळेतच व्यवसाय करावा लागेल. वेळ संपल्यानंतर विक्रेत्याने आपले सर्व साहित्य काढुन घेऊन जागा रिकामी करुन घ्यावी लागेल.

(छ)फळे, भाजीपाला, फुले, अन्न, मासे, कृषी उत्पन्न बाजार इत्यादी विशिष्ट प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या प्रक्षेत्रांमध्ये त्या-त्या संबंधित वस्तु विक्रेत्यांशिवाय अन्य विक्रेत्यांना व्यवसाय करता येणार नाही.

(ज) पथविक्रेत्यांना पथविक्रीचे ठिकाणी अन्न् पदार्थ तयार करुन किंवा शिजवून विक्री करता येणार नाही.

(झ) जी प्रक्षेत्रे आठवडे बाजार म्हणुन निश्चित केली आहेत. अशा प्रक्षेत्राच्या धारण क्षमतेनुसार प्रथम येणारास प्रथम प्रधान्य या तत्वावर आठवडे बाजार भरविला जाईल.

(त्र) सण किंवा उत्सवाचे वेळी तात्पुरत्या कालावधीसाठी निर्माण केलेल्या पथविक्री प्रक्षेत्रात तात्पुरता विक्री परवाना असल्याशिवाय व्यवसाय करता येणार नाही. तात्पुरत्या परवान्याची मुदत संपल्यानंतर त्वरीत जागा खाली करुन दयावी लागेल.

(ट) पथविक्रेत्याने योजनेत तरतुद केलयानुसार मुदतीत विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण न केल्यास त्यास विक्री प्रक्षेत्रातून निष्काशित करणेत येईल.

(ठ) पथविक्रेत्यांना नेमुन दिलेल्या जागेची सार्वजनिक प्रयोजनासाठी नाशिक महानगरपालिकेस आवश्यकता असल्यास अधिनियमाच्या कलम १८ मधील तरतुदींनुसार जागा खाली करुन घेण्यात येईल आणि त्याठिकाणच्या पथविक्रेत्याची अन्य विक्री प्रक्षेत्रात व्यवस्था करण्यात येईल.

(ड) महानगरपालिका आयुक्त तथा अध्यक्ष, नगर पथ विक्रेता समिती यांना आवश्यकतेनुसार वेळोवेळी फेरीवाला क्षेत्राची जागा बदल करण्याचा अधिकार असेल.

५. **फिरत्या पथ विक्रेत्यांचे विनियमन:-**

(१)फिरत्या पथविक्रीचा परवाना असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस ढकलगाडी, पायी दारोदार फिरुन, कोणत्याही वाहनाच्या वापराव्दारे, डोकओझी किंवा अन्य अशा प्रकारच्या कोणत्याही पध्दतीने पथविक्रीचा व्यवसाय करता येणार नाही.

(२)फिरते पथविक्रेत्यांने त्यास नेमुन दिलेल्या हददीतच फिरुन व्यवसाय करावा. कोणत्याही रस्त्यावर किंवा चौकात एकाच जागेवर थांबुन व्यवसाय करता येणार नाही.

(३)फिरता फेरीवाला वाहन अगर हातगाडीचा वापर व्यवसायासाठी करणार असल्यास हददीनुसार ठरवुन दिलेला रंग आपल्या व्यवसाय हातगाडीस/वाहनास लावून तदनंतरच व्यवसाय चालु करता येईल.

(४)फिरत्या पथविक्रेत्यास नेमुन दिलेल्या हददीच्या बाहेरुन हातगाडीवर/वाहनावर व्यवसायाचा माल आणणे आवश्यक असल्यास बाहेरील हददीमधुन नेमुन दिलेल्या हददीमध्ये येईपर्यंत हातगाडीवरील माल कापडाने किंवा ताडपत्रीने झाकुन आणणे आवश्यक राहील. नेमुन दिलेल्या हददीमध्ये आल्यानंतरच मालाची विक्री करता येईल.

(५)फिरत्या पथविक्रेत्याने त्याला दिलेले ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने व्यावसाय करते वेळी दर्शनी भागात लावणे आवश्यक राहिल.

(६)पथविक्रेता ओळखपत्र किंवा विक्री प्रमाणपत्राचा गैरवापर केल्याचे आढळल्यास ओळखपत्र/विक्रीप्रमाणपत्र रदद् किंवा निलंबित करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल्.

(७)फिरत्या पथ विक्रेत्यास नेमुण दिलेल्या हद्दीच्या वर्गीकरणानुसार नाशिक महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार दैनंदिन/मासिक जागा लायसेन्स फी महानगरपालिकेस अदा करणे बंधनकारक राहिल.

(८)फिरत्या पथ विक्रेत्यास देण्यात आलेले ओळखपत्र किंवा विक्री परवान्याचे हस्तांतरण करता येणार नाही किंवा विक्री अथवा भाडेपट्टयाने देता येणार नाही.

<u>प्रकरण चार</u>

## विक्री प्रक्षेत्रांत नागरी सोयी-सुविधा पुरविणे.

६. (१) महानगरपालिका विक्री प्रक्षेत्रांत वीज, पिण्याचे पाणी, दैनंदिन साफसफाई यासारख्या मुलभूत सुविधा पुरविल.

(२) काही विशिष्ठ विक्री क्षेत्रात अन्य काही सुविधा पुरविण्याची आवश्यकता भासल्यास अशा सुविधा मनपाच्या सक्षम प्राधिका-याच्या मंजुरीने पुरविणेत येतील.(उदा.कोल्ड स्टोरेज इत्यादी)

(३) संबधित पथविक्रेत्यास नाशिक महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करील त्या दराने मासिक देखभाल आकार (मेन्टेनन्स चार्जेस) दरमहाचे १० तारखेपर्यंत महानगरपालिकेमध्ये भरावे लागतील.

(४) महानगरपालिकेतर्फे देखभाल आकार (मासिक मेन्टेनन्स) दरात दर तीन वर्षांनी १० %वाढ करणेत येईल. अशी करण्यात येणारी दरवाढ पथविक्रेत्यावर बंधनकारक असेल.

(५) वरील (३) व (४) मध्ये नमुद केलेले मेन्टेनन्स चार्जेस हे पथविक्रेत्यास भराव्या लागणा-या पथविक्री शुल्का पेक्षा (दैनंदिन/मासिक जागा लायसेन्स फी) वेगळे असतील.

<u>प्रकरण पाच</u>

## दंड आकारणी

७. (१) अधिनियमाच्या कलम १८ (४) नुसार पथविक्रेता पथविक्री प्रक्षेत्रातील जागा रिकामी करुन देण्यास असमर्थ ठरल्यास अधिनियमाच्या कलम १८ (५) मधील तरतुदीनुसार त्या पथविक्रेत्यास नोटीसचा कालावधी संपल्यानंतर दर दिवसासाठी रु.२५०/- पर्यंतचा दंड आकारणेत येईल.

(२) मात्र अशा दंडाची एकूण रक्कम जप्त केलेल्या मालाच्या किंमतीपेक्षा अधिक होणार नाही.

(३) जर पथविक्रेता;
(अ)पथविक्री प्रमाणपत्राशिवाय पथविक्रीचा व्यवसाय असेल;
(ब)पथविक्री प्रमाणपत्राच्या अटी-शर्ती भंग करीत असेल किंवा
(क)पथविक्री अधिनियम, नियम किंवा योजनेतील तरतुदींचा भंग करीत असेल,
तर दंड आकारणारा प्राधिकारी अशा प्रत्येक प्रकरणी रुपये दोन हजार पर्यंत कसूरदारास दंड करिल. परंतु दंड आकारणारा प्राधिकारी पथविक्रेत्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(४) विक्री प्रमाणपत्राचे विहित कालावधीत नुतनीकरण न केल्यास विलंब कालावधीसाठी रुपये १५/- प्रतिदिन इतका दंड आकारण्यात येईल.

<u>प्रकरण सहा</u>

## पथविक्री क्षेत्रातील कर आणि फी च्या वसुलीचे विनियमन

८. (१) महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याने वेळोवेळी निश्चित केलेले जागा लायसेन्स फी चे दराने प्रत्येक पथविक्रेत्याकडुन दैनंदिन/मासिक जागा लायसेन्स फी वसुल करणेत येईल.

(२)मासिक जागा लायसेन्स फी चे बाबतीत प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत पथविक्रेत्याने फी भरली पाहिजे.

(३) पथविक्रेत्यास जागा नमून दिल्यानंतर एक महिन्याची जागा लायसेन्स फी आगाऊ भरणे बंधनकारक राहील.

(४) पथविक्रेत्याच्या विक्री प्रक्षेत्रात बदल झाल्यास नवीन विक्री प्रक्षेत्रास लागु असलेल्या जागा लायसेन्स फी च्या दराने फी वसूल करण्यात येईल.

(५) सण-उत्सव कालावधीतील तात्पुरत्या विक्री परवाना धारकांनी संबधीत कालावधीची जागा लायसेन्स फी आगाऊ भरणे बंधनकारक राहील.

(६) आठवडे बाजार, सण-उत्सव बाजार या ठिकाणी विक्री प्रक्षेत्रासाठी विहित केलेल्या वर्गीकरणानुसारच दैनंदिन जागा लायसेन्स फी चे दर लागु राहतील.

(७) ज्या बाबींसाठी पथविक्रेत्यास शासकिय कर भरणे आवश्यक असल्यास असे कर जागा लायसेन्स फी चे व्यतिरिक्त असतील.

(८) पथविक्री प्रक्षेत्रात पुरविण्यात येणा-या नागरी सोयी सुविधांसाठी अधिनियमाचे कलम १७ अन्वये आकारणी करण्यात येणारे देखभाल आकार जागा लायसेन्स फी चे व्यतिरिक्त असतील.

(९) दैनंदिन/मासिक जागा लायसेन्स फी अथवा इतर दंड आकार इ. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत प्रत्यक्षपणे किंवा राष्ट्रीयकृत बँकेमार्फत किंवा अन्य साधनाव्दारे वसुल करण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

## प्रकरण सात

### विक्री प्रक्षेत्रात जनतेला पुरविणेत येणा-या वस्तु आणि सेवांच्या दर्जा आणि सार्वजनिक आरोग्य

९. (१) पथविक्रेता जनतेला पुरविणेत येणा-या वस्तु व सेवांचा दर्जा निर्धारीत मानकांनुसार असल्याची सुनिश्चिती करेल.

(२) पथविक्रेता पथविक्री व्यवसायातून निर्माण होणा-या कच-याची एकत्रितपणे विल्हेवाट लावण्यासाठी योगदान देईल. विक्री व्यवसायातून निर्माण होणा-या कच-याची रोजचे रोज नाशिक महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या सुविधेव्दारे विल्हेवाट लावेल. (उदा. घंटागाडी, कचराकुंडी इत्यादी)

(३) पथविक्रेता पथविक्री क्षेत्रात खुल्या जागेत, रस्त्याच्या कडेला किंवा गटारात अनाधिकृतपणे कचरा रचुन ठेवणार नाही. पथविक्री प्रक्षेत्रात संपूर्ण वेळ स्वच्छता राहील यासाठी पथविक्रेता योगदान देईल.

(४) पथविक्रेता जनतेचे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षितता यासाठी उपद्रवी, धोकादायक व प्रदुषणकारी जलदगतीने विकल्या जाणा-या वस्तु विकणार नाही.

(५) पथविक्रेत्यास पथविक्री प्रक्षेत्रात स्वयंपाक करण्यास किंवा अन्न पदार्थ तयार करण्यास परवानगी असणार नाही.

(६) पथविक्री प्रक्षेत्रात निर्माण होणारा कचरा जाळण्यास परवानगी असणार नाही.

<u>प्रकरण आठ</u>

<u>संकिर्ण</u>

९. (१) कोणत्याही जुन्या योजनेअंतर्गत अथवा विशेष मंजुरीने पथविक्रीची परवानगी दिली आहे अशा सर्व व्यक्तींना या उपविधीच्या तरतुदी लागु होतील.

(२) या पूर्वीच्या कोणत्याही परवानगीने वाटप झालेल्या जागेवर विक्रेत्याने कोणतीही स्थिर संरचना/बांधकाम केलेले असल्यास विक्रेत्याने ते निष्कासित करुन जागा पूर्णता मोकळी करणे आवश्यक आहे.

(३) भोगवटदाराच्या अपात्रतेमुळे रिकाम्या झालेल्या जागा त्या-त्या पथविक्री प्रक्षेत्रांसाठी असलेल्या प्रतिक्षा यादीतील नोंदणीकृत व्यक्तींना वाटप करण्यासाठी विचारात घेण्यात येतील.

(४) पथविक्रेते व इतर हितसंबधित व्यक्ती यांच्याशी विचारविनिमय करुन विक्री प्रक्षेत्रांतील शौचालये, कचरा विल्हेवाट सुविधा, प्रकाश योजना, मालवाहतुक करणा-या विशिष्ठ प्रकारच्या हातगाडया, वाहनतळ सुविधा या सारख्या सेवांच्या सुधारणेसाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत सहाय्य करण्यात येईल्.

(५) पथविक्रेत्यांचे हक्क व जबाबदा-या, त्यांच्याशी संबधित धोरणे, कायदे व योजना, अन्न सुरक्षा, आरोग्य राखणे, कच-याची विल्हेवाट यांसारख्या बाबींवर पथविक्रेत्यांचे दिशा निर्देशन करण्याच्या हेतुने पथविक्रेत्यांसाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

(६) फेरीवाला धोरण उपविधी मधील काही कलमामध्ये वेळोवेळी अंशता अथवा पुर्णत: बदल करणेचा तसेच वेळोवेळी नविन कलम समाविष्ट करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असेल.

-सही-
तुकाराम मुंढे, ( भा.प्र.से. )
आयुक्त्,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक

दिनांक:- २१/०३/२०१८